Literacy for a Billion

Movie: Ya Malak
Year: 1964

Song: Priticha Nav Vasant Khulala
Lyricist: S. A. Shulk

प्रितीचा नव वसंत फुलला
प्रितीचा नव वसंत फुलला
ह्रदयातरी खुलला
नव्या नवतीचा नवलाईचा
बाग दिलाचा दरवळला
प्रितीचा नव वसंत फुलला

पुरे प्रितीचा छंद चाळा
पुरे प्रितीचा छंद चाळा
जगावेगळा हा असला
जगावेगळा हा असला
नाजूक साजूक गोजिरवाणी
किती ग भोळी तू फुलराणी
प्रणय साज शृंगार साजनी
अंगारत जणू रसरसला
प्रितीचा नव वसंत फुलला

प्रियकर मधूकर धावून येईल
प्रियकर मधूकर धावून येईल
रसिकराज मधू धुंदी घालील

मंजूळ गुंजनी मंजूळ गुंजनी
सदा रंगविल
ह्या हसऱ्या फुलराणीला
प्रितीचा नव वसंत फुलला

कुटील भृंग रंगेल वृत्तीचा
कुटील नवरस रंग नवतीचा
कुटील भृंग रंगेल वृत्तीचा
कुटील नवरस रंग नवतीचा
वंचिल चंचल इश्क रसाचा
लोटेल विरहा नलिकलिकेला
प्रितीचा नव वसंत फुलला

प्रेमळ कमळन चतूर धूर्त ही
प्रेमळ कमळन चतूर धूर्त ही
भृंग सख्याला कोंडील ह्रदयी
सहजच तो मग अंकित होई
जिंकीत प्रेम जगाला
प्रितीचा नव वसंत फुलला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*